# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३

## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २)**

(१) **सर्वश्री.रोहित पवार, दिपक चव्हाण, हसन मुश्रीफ, बाळासाहेब पाटील, चेतन तुपे, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर चित्रनगरीत चित्रीकरणासाठी अद्ययावत सोयीसुविधा निर्माण करण्याचा निर्णय मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास येणे, सदर बैठकीत चित्रनगरीचा अधिकाधिक विकास आणि आधुनिकीकरणाचे नियोजन करुन त्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबरोबरच आवश्यक त्या निविदा काढण्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी आदेशित करण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, तसेच सदर बैठकीत त्याचबरोबर सौरऊर्जा प्रकल्प बसविणे, बाहयस्तोत्रावर सुरक्षा रक्षक पुरवणे, कर्मचारी वर्ग पुरविणे, कोल्हापूर चित्रनगरीत आवश्यक तेथे पथदिवे लावणे, पाण्याची उच्चतम टाकी बांधणे याबाबतही चर्चा होऊन निर्णय घेण्यांत आला असल्याचेही निदर्शनास येणे, सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार त्याबाबत निविदा प्रक्रिया व अन्य तद्नुषंगिक कामे करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. रवि राणा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मु.का.अ.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या प्रमूख

अप्रकाशित

उपस्थितीत गुगल मीटिंगमध्ये चंदा बेलसरे व इतर आरोग्य सेविका यांनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी मांडल्या असणे, अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषद आस्थापनेवरील आरोग्यसेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे, दिपाली शिंदे, पद्मा जाधव, सुनंदा नाथे, आदींनी राज्य सरकारकडून खालील मागण्या मंजूर करण्यात यावे या मागणीसाठी जिल्हापरिषद, अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा भा. प्र. से. यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले यांच्या प्रमूख उपस्थितीत झालेल्या गुगल मीटिंग मध्ये अमरावती जिल्ह्यातील आरोग्य सेविका यांनी भाग घेऊन मीटिंग मध्ये आरोग्य सेविका कृती समितीच्या वतीने चंदा बेलसरे आरोग्य सेविका पदाधिकारी यांनी आरोग्य सेविकांच्या हिताच्या एकूण १८ मागण्या मांडल्या असणे, ज्या जी.प. अमरावती संबधित आ हेत त्या सोडविल्या जातील असे आश्वासन जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. ढोले यांनी दिले असणे, तर जे सरकारकडील विषय आहेत त्या सरकारचे मंत्रालयीन विभाग यांच्याकडे पाठविल्या असल्याचं त्यांनी सांगितले, अमरावती येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांना वरील मागणीचे निवेदनामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्याकडे देऊन त्यांचें कार्यालयाचे उप आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक ५९९/२९२३ दिनांक १ मार्च, २०२३ रोजी अवर सचिव, आस्था.८, ग्राम विकास विभाग , बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट मुंबई, मंत्रालय यांना पाठवले असणे, विशेषत: यापूर्वीही सरकारने या मागणीचा विचार करून निर्णय घेण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील स्थानीक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत त्यांच्या उपस्थितीत नागपूर अधिवेशनादरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री यांच्याकडे विधान भवनात तसेच राज्य सरकारचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना ०१ ते १८ मागण्यांचे निवेदन दिलेले असणे, ज्या निवेदनामध्ये त्यांनी खालील प्रमाणे मागण्या मांडल्या होत्या त्यामध्ये सन २००५ नंतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, आरोग्य सेविका नियमित यांची पदभरती करून त्वरित रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य सेवक याप्रमाणे आरोग्य सेविका यांना विना प्रशिक्षण पदोन्नती देण्यात यावी, प्रशिक्षणाची अट रद्द करण्यात यावी, तसेच सर्व आरोग्य सेविकांची ज्येष्ठता सूची लवकरात लवकर प्रशिक्षण पूर्ण करून घ्यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन एल. एच. व्हीं. पदे भरण्यात यावी, तसेच आरोग्य प्राथमिक केंद्र स्तरावर एक ऐवजी दोन आरोग्यसेविका पदे भरण्यात यावी, तसेच तालुका स्तरावर आरोग्यसेविका पदनिर्मिती करण्यात यावी, तसेच रिक्त पदाचा उपकेंद्राचा मांडण्याकरिता आरोग्य सेविका यांना अतिरिक्त वेतन देण्यात यावे, तसेच वाढत्या पेट्रोलची महागाई पाहता आरोग्य सेविका यांचा कायम प्रवास भत्ता पंधराशे रुपये भरून तीन हजार रुपये करण्यात यावा, नियमित पदोन्नतीची नस्ती निकाली काढणे व पद रिक्त झाल्याबरोबर दुसरे महिन्यात ज्येष्ठतेच्या यादीनुसार पात्र पदोन्नती देण्यात यावी, तसेच आरोग्य सेविकांना कार्य करण्याचा पाच दिवसाचा

आठवडा करण्यात यावा, तसेच आरोग्य सेविका यांचे कायमस्वरूपी पदे भरण्यात यावी, तसेच कंत्राटी पद्धत बंद करण्यात यावी, तसेच कोरोना संक्रमण महामारीच्या काळात आरोग्य सेविका यांनी जिवाची काळजी न करता अहोरात्र काम केल्यामुळे त्यांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्यात यावी, आरोग्य सेविका हिला चालू सेवाकाळामद्ये **GNN** ट्रेनिग **with salary** अशी पद्धत सुरु करणे, निवासस्थान राहणे योग्य नसल्यास आरोग्य सेविकांना घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच सर्व ऑनलाईन पोर्टल जबाबदारी इतर कर्मचारी यांना देण्यात यावे जेणेकरून टेक्निकल कामकाज आरोग्य सेविकेला गुणवत्तापूर्वक सेवा रुग्णांना देता येतील, यासह एक ते १८ प्रकारचे आदींचा समावेश असलेले निवेदन आरोग्य सेविका यांनी राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन देऊन अवगत केलें असणे, परंतु अद्याप पर्यंत शासनाकडून वरीलप्रमाणे निर्णय झाला नसणे म्हणुन वरील प्रमाणे शासन निर्णय, आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, अजित पवार, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. चेतन तुपे, सुनिल टिंगरे, रोहित पवार, संजय जगताप, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महत्वाची भूमिका बजावणारे व देशाच्या स्वातंत्र्यासाठी तत्कालीन ब्रिटीश सरकारकडून फाशीची शिक्षा पत्करुन जिवाचे बलिदान देणारे हुतात्मा श्री. शिवराम हरी राजगुरु यांचे पुणे जिल्हयातील खेड (राजगुरुनगर) तालुक्यातील खेड हे जन्मस्थळ असणे, या हुतात्माचा गावातील हा वाडा राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी १९८० च्या दशकात देशप्रेमींकडून शासनाकडे करण्यात आलेली असणे, सन १९९५ मध्ये या स्मारकाच्या कामास गती मिळाल्याचे दृष्टोत्पतीस येणे, तथापि १९९५ पासून तत्कालीन शासनाने स्मारकाच्या कामास वेळोवेळी निधी देण्याचे घोषित करण्यात येणे, परंतु आजतागायत हा वाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम पुर्णत्वास आलेले नसणे, त्यामुळे सदर हुतात्मा स्मारक हे केवळ कागदापुरतेच मर्यादीत आहे की काय अशी संमभ्रावस्था निर्माण होणे, तसेच स्मारकाचे काम रखडल्यामुळे त्याठिकाणी अनेकांनी अतिक्रमण केल्याचे आढळून येणे, याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी (खेड-राजगुरुनगर मतदार संघ) यांनी त्यानंतर आतापर्यंत अनेकदा लेखी पत्राद्वारे व सभागृहात प्रश्न मांडून शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधण्याचा केलेला प्रयत्न, माध्यमांनी देखील त्यांची वेळोवेळी दखल घेणे, परंतु असे असतांनाही हुतात्मा राजगुरु यांचा वाडा राष्ट्रीय स्मारक म्हणून अस्तित्वात न येणे, त्यामुळे पुणे जिल्हयातील खेड तालुक्यासह राज्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करुन हुतात्मा राजगुरु यांचे स्मारक उभारण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रकाशित प्रत

(४) **प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील विक्रोळी कन्नमवार नगर येथील ४५ वर्षांपूर्वी सर्वसामान्य मागासवर्गीय लोकांसाठी मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत ३१ इमारती शासनाने उपलब्ध करून देणे, येथील बहुसंख्य इमारतींचे अभिहस्तांतरण झालेले असून या इमारती ४५ ते ५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या असल्याने या इमारती धोकादायक अवस्थेत असणे, जीर्ण इमारतींमुळे अनेक दुर्घटना घडल्या असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याने या इमारतींची तातडीने पुनर्विकास करण्याची आवश्यकता असताना सामाजिक न्याय विभागाने अनेक अटी व शर्ती लावून पुनर्विकासास अडथळे निर्माण करणे, समाज कल्याण विभागाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, १९८५ च्या आदेशात सभासदांच्या मृत्यूपश्चात नियमानुसार वारसदारांचे सदस्यत्व मंजूर करणे आवश्यक असून सामाजिक न्याय विभागाने पुन्हा वारसदारांचे जातीचे, दाखले, उत्पन्नाचे दाखले, वास्तव्याचे दाखले व इतर कागदपत्रे मागणी करणे, यापूर्वी या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार आयुक्त, समाज कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून या समितीनेही अद्याप कोणत्याच शिफारसी व अहवाल शासनास सादर न करणे, त्यामुळे या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासास बसलेली खीळ, इतर शासकीय गृहनिर्माण संस्थांवरील निर्बंध काही वर्षातच उठविले जातात परंतु मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून जाणीवपूर्वक अडथळा निर्माण केला जात असल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, सन १९७८ पासून या गृहनिर्माण संस्थेतील अनेक खरेदी विक्री व्यवहार हे म्हाडा, स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन कार्यालयाच्या माध्यमातून नोंदणी करून व अभिहस्तांतरण झालेल्या गृहनिर्माण संस्थांनी स्वतःच्या अधिकारात व्यवहारांना मान्यता देऊन महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार सर्व कामकाज केले असताना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रानुसार कालबाह्य व गैरलागू अटी व शर्ती लादून धोकादायक इमारतीमध्ये जीव मुठीत ठेवून जीवन जगणाऱ्या रहिवाशांच्या पुनर्विकासाला अडचणी निर्माण केल्यामुळे जनमाणसात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने चौकशी करून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांच्या पत्राबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(५) **श्री.महेश लांडगे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे विलिनिकरण पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या संस्थेमध्ये करण्यात येणे, परिणामी प्राधिकरणाच्या जवळपास ३० हजार भूखंडाचे प्रॉपर्टीकार्ड बनविण्याचे काम अद्यापही प्रलंबित असणे, सन २०१८ मध्ये सेक्टर २ मधील मिळकतदारांना प्रायोगिक तत्वावर प्रॉपर्टीकार्ड देण्यात आले असणे, सद्य स्थितीला प्रशासनाच्या दिरंगाईमुळे मूळ प्राधिकरण हद्दीचे नकाशे उपलब्ध नसणे, यामुळे प्राधिकरणाची नेमकी हद्द कोणती याबाबत संभ्रम कायम असणे, जागा मालकाचे ७/१२ उताऱ्यावर प्राधिकरण संपादित असा शेरा असल्याने प्राधिकरण जागेत दिवसेंदिवस वाढत असलेले अतिक्रमण व त्यावर उभी राहत असलेली बेकायदेशीर बांधकामे, यामुळे स्थानिक महापालिका प्रशासनाच्या महसूली उत्पन्नावर होणारा परिणाम, त्यानुषंगाने महसूल विभाग व मा.जमाबंदी प्रशासनाने प्राधिकरण हद्दीचे अत्याधुनिक पद्धतीने जीसीपीएस आणि ईटीएस प्रणालीद्वारे हद्द कायम करण्याची आवश्यकता, त्याद्वारे ३० ते ४० हजार भूखंडावरील जागा मालकांना तात्काळ दिलासा देण्याची गरज, यावर शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"आरे कॉलनी (गोरेगांव (पूर्व), मुंबई) येथील आरे प्रशासनाच्या अखत्यारित येत असलेल्या शासकीय रुग्णालयाचे हस्तांतरण, अंतर्गत रस्ते व प्रवेशद्वाराचे नामकरण, पिकनिक स्पॉट उदयानाचे सौंदर्यीकरण, आरे तलावाचे सुशोभिकरण, स्टार शौचालय आदि शासन स्तरावर गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे,आरेमधील शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, सदरहू शासकिय रुग्णालय महापालिकेकडे हस्तांतरित केल्यास जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर सेंटर किंवा गोरेगांव पश्चिम येथील सिध्दार्थ मनपा प्रशासनाच्या रुग्णालयाशी जोडल्यास रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होणे, डॉक्टर व कर्मचारी वर्ग उपलब्ध होणे, त्याचबरोबर आरे अंतर्गत ४५ कि.मी. च्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, सदरहू रस्ते दुरुस्तीकरिता दुग्धविकास विभागाकडे निधी उपलब्ध करण्यास होत असलेली चालढकल, आरे अंतर्गत रस्ते करण्यास शासनाकडे निधी नसल्यास शासनाने देखभाल व दुरुस्तीकरिता हे रस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची आवश्यकता, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २/११/२०२२ रोजी १७३.०० कोटीचा प्रस्ताव मंजूरीकरिता शासनाकडे सादर करणे,यापैकी ४७ कोटीचा डांबरीकरणाकरिता तांत्रिक मान्यता देण्यात आली असून सदर प्रस्ताव निधी मंजूरीकरिता वित्त विभागाकडे

अग्रिम प्रत

प्रलंबित असणे, स्टार शौचालयास निधी मंजूर व परवानग्या असूनही केवळ शासनाच्या स्थगितीमुळे रखडलेला असणे, तसेच आरे गोरेगांव चेकनाका येथे उभारण्यात येत असलेल्या प्रवेशद्वारास "छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार" असा नामकरणाचा प्रस्ताव मंजूरीअभावी प्रलंबित असणे, आरे परिसरातील मरोळ, पवई व गोरेगांव असे तीन चेकनाका येत असून आरे हे पर्यटनस्थळ असल्याने याठिकाणी राज्यातून / परदेशातून पर्यटक येत असणे, त्यामुळे आरेमधील पिकनिक स्पॉट उदयानाचे सौदर्यीकरण,आरे तलावाचे सुशोभिकरण तातडीने करण्याची आवश्यकता, सदरहू पर्यटन स्थळे ही देखभाल व दुरुस्तीकरिता संस्थाच्या ताब्यात देतांना सनियंत्रण समितीच्या कोणत्याही आवश्यक त्या परवानग्या संबंधित यंत्रणेमार्फत घेतलेल्या नसणे, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन होत असलेल्या अनधिकृत बांधकामांकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे आरे परिसरातील सौंदर्याचा व पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, आरेच्या सौदर्यात भर घालणारे भव्य असे प्रवेशद्वार उभारण्याबाबतचा प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता, आरे कॉलनीतील प्रलंबित कामासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुनही शासन स्तरावर कार्यवाही होण्यास होत असलेला विलंब, परिणामी स्थानिक नागरिक विकासापासून वंचित होणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर कार्यवाही करुन तातडीने निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"भारतीय वन संवर्धन कायदा १९८० लागू होण्यापूर्वी विविध सिंचन प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच ग्रोमोअर योजना, भूमिहीनांच्या व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी वेगवेगळया वन विभागाच्या जमिनीचे वाटप करण्यात आले असणे, ४५-५० वर्षापेक्षाही जास्त कालावधी या जमिनी सदर शेतकऱ्यांच्या ताब्यात असून, वहिवाटीत असणे, वन संवर्धन कायदा १९८० पूर्वी निर्वनीकरण करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना असणे, निर्वनीकरण न करता वाटप करण्यात आलेल्या शेतजमिनी वन विभागाचे निर्बंध असणे त्यामध्ये अनेक कायदेशीर अडचणी निर्माण झालेल्या असणे, याच जमिनीच्या उत्पन्नावर संबंधित शेतकऱ्यांची उपजीविका सुरु असणे, सद्यस्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे वन नसताना व त्या जमिनी या शेतजमीन असताना त्या ठिकाणी शेतकरी व नागरिकांना जमिनीचे हस्तांतर करणे व त्या ठिकाणी वेगवेगळ्या योजना राबविणेसंदर्भात कायदेशीर अडचणी निर्माण होत असणे, ज्यांच्या जमिनी वेगवेगळ्या शासकीय प्रकल्पासाठी संपादित झालेल्या वर्ग एक जमीन असताना त्यांना वर्ग दोनची जमीन देऊन सदर शेतकऱ्यांवर देखील अन्याय झालेला असणे, त्यामुळे सदर बाबतीमध्ये केंद्र शासनाकडे

पाठपुरावा करून या जमिनी निर्वनीकरण करण्याची आवश्यकता, राज्यात अनेक ठिकाणी वन विभागाच्या जमिनीतून शेतकऱ्यांच्या व सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांच्या पाईप लाईन जात असणे, शेतकऱ्यांना या पाईपलाईनसाठी पूर्वलक्षी प्रभावाने परवानगी मिळण्याची आवश्यकता, तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर बिबटे व तत्सम हिंस्त्र वन्य प्राण्यांचा धोका निर्माण झाला असणे, यामुळे नागरिक व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीची वातावरण व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस कॅन्सर या आजाराच्या विळख्यात अडकणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याची गंभीर बाब निदर्शनात येणे, कॅन्सर च्या उपचारासाठी येणारा खर्च हा सामान्य व्यक्तीच्या आवाक्या बाहेर असून सध्या मुंबई व परिसरात कॅन्सर करिता सिटीस्कॅन चा खर्च १०,०००/- रुपये, एम.आर.आय करिता १५,०००/- रुपये, बी.आय.ओ.एक्स.बी.एक्स.वाय करिता ५,०००/- रुपये, किमोथेरपी करिता २,००,०००/- रुपये, रेडिएशन करिता १,००,०००/- रुपये, ऑपरेशन करिता २,००,०००/- इतका अंदाजे खर्च येत असणे, सदर खर्च हा सामान्य माणसाच्या आवाक्या बाहेर असून इतका मोठा खर्च शासनाच्या योजने अंतर्गत समाविष्ट करणे शक्य होत नसणे, मुंबई मधील टाटा रुग्णालयात उपचारासाठी संपूर्ण देशभरातून रुग्ण येत असणे, टाटा रुग्णालयात उपचाराकरिता येणाऱ्या रुग्णांना रुग्णालयात प्रवेश मिळविण्यासाठी ५-६ महिने प्रतीक्षा करावी लागत असणे, खाजगी रुग्णालयात उपचार घेणे हे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे नसणे, मुंबईतील वडाळा बी.पी.टी. च्या क्षेत्रामध्ये नवीन रुग्णालय बांधण्याकरिता आवश्यक जागा उपलब्ध असल्याचे निदर्शनात येणे, उपचारअभावी कॅन्सर या आजाराने मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत असून सदर बाब ही गंभीर होत असल्यामुळे मुंबई मध्ये अत्याधुनिक सोयी सुविधा असलेले नवीन रुग्णालय उभारण्याची नितांत आवश्यकता, ही बाब लक्षात घेऊन शासनाने जलदगतीने कृती करून सदर ठिकाणी अद्ययावत कॅन्सर रुग्णालय उभारण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री.प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी ब्राम्हण समाजाने राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करणे, राज्यातील ब्राम्हण समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हालाकीची होणे, सुशिक्षित तरूणांना शासकीय नोकऱ्यांची संधी कमी होणे, पर्यायाने खाजगी नौकरी  व व्यवसाय करण्यासाठी पर्याय नसणे, गरीब कुटुंबातील तरूणांना शैक्षणिक व व्यवसायासाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **कुमारी आदिती तटकरे, श्री.अमित साटम, ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री.छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, रोहित पवार, दत्तात्रय भरणे, शेखर निकम, संजय बनसोडे, भास्कर जाधव, सुनिल प्रभू, संजय पोतनीस, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम रखडल्याने आणि दुरावस्था झालेली असल्याने परिसरातील कोकणवासीय नागरीक व पत्रकारांनी माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्यासुमारास कोलाड नाका येथे मानवी साखळी करत आंदोलन केलेले असणे, या महामार्गाच्या रखडलेल्या चौपदरीकरणाच्या कामाची उच्चस्तरिय समिती गठीत करुन चौकशी व्हावी आणि दोषी अधिकारी व सबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केलेली असणे, डिसेंबर, २०२२ मध्ये पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे,

अप्रकाशित प्रत

महामार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून दररोज होणारे अपघात रोखणे तसेच महामार्गाचे अनेक वर्षांपासून सुरु असलेले काम पुर्ण करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, सदरची परिस्थीती अधिकच गंभीर बनत चाललेली असणे, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून अपुर्णावस्थेतील कामांमुळे नागरीकांना त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, महामार्गाच्या दुर्दशेमुळे आतापर्यंत हजारो अपघात झालेले असून शेकडो जणांना आपला जीव गमवावा लागलेला असल्याची माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात गंभीर माहिती उघडकीस येणे, सदर प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधी, पत्रकार व सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांचेकडे अलिकडील काळात वारंवार मागण्या करणे, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोकण परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, दुरावस्थेत असलेल्या महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने याप्रकरणी वेळीच हस्तक्षेप करुन अडचणींत असलेल्या वाहनचालकांबरोबरच नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी महामार्गाचे काम मार्गी लावून आवश्यक उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(३) **सर्वश्री. अशोकराव चव्हाण, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, मोहनराव हंबर्डे, बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता.बिलोली, जि.नांदेड) या संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या सभासदांच्या शेतजमिनीच्या सिंचनासाठी कुंडलवाडी, शेळगांव, चन्नापूर आणि पाटोदा आष्टी अशा दोन उपसा जलसिंचन योजनांचे काम सन १९८५ मध्ये सुरु होणे, या कामाकरिता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नांदेड यांनी संस्थेला रु.२,०५,२७,८६८/- इतके कर्ज मंजूर करुन त्याचा बोजा शेतकऱ्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर टाकणे, १९८५ मध्ये सुरु झालेले काम १९९४ मध्ये पुर्ण होणे, सदरची योजना प्रत्यक्षात कार्यान्वीत न होणे, योजनेतील ५६९ शेतकरी सभासदांपैकी बहुतांश सभासद मागासवर्गीय व अल्प भुधारक असणे, दोन्ही उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना सिंचनाचा कोणताही लाभ न मिळणे, मात्र, शासनाने २०१४ मध्ये आश्वासन देवूनही शेतकऱ्यांची कर्जाची रक्कम अद्याप माफ न केल्यामुळे ७/१२ वर कर्जाची नोंद असणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे जमिनीचे व्यवहार पुर्णपणे ठप्प होवून शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा सातत्याने वाढत जाणे, या बरोबरच राज्य शासनाने दि.२७/१२/२०१९ रोजी जाहिर केलेल्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजने

अंतर्गत कर्ज मुक्तीसाठी पात्र ठरलेल्या नांदेड जिल्हातील बँक ऑफ बडोदा शाखा कुंडलवाडी, जि. नांदेड या बँकेचे खातेदार असणाऱ्या १२०० शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे पैसे बँकेकडे जमा होणे, त्यापैकी ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणात कर्जमाफीची रक्कम आणि प्राप्त झालेली रक्कम यांचा ताळमेळ जूळत नसणे, त्यामुळे शासन स्तरावरुन मार्गदर्शन घेऊन बँकेने सदरची रक्कम परत करणे, बँकेने परत केलेल्या ५३६ शेतकऱ्यांच्या प्रकरणातील कर्जमाफीची निश्चित रक्कम बँकेकडे अद्यापही पुन्हा जमा न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर अजूनही कर्ज दिसत असणे, जुने कर्ज थकीत असल्यामुळे शेतकऱ्यांना बी-बीयाणे व शेतीच्या कामासाठी नव्याने कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होणे, यासंदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड आणि बँक ऑफ बडोदा, शाखा कुंडलवाडी जि. नांदेड त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधीसह कर्ज मुक्तीसाठी पात्र शेतकऱ्यांकडून सातत्याने पाठपुरावा करुनही कर्ज माफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्यापही जमा न होणे, या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, कुंडलवाडी, (ता. बिलोली, जि. नांदेड) या संस्थेच्या ५६९ शेतकरी सदस्यांच्या प्रकरणी २०१४ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने त्यांचे कर्ज तातडीने माफ करण्याची आवश्यकता असून महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजने अंतर्गत पात्र ५३६ शेतकऱ्यांची कर्ज माफीची रक्कम त्यांच्या खात्यात तात्काळ जमा होण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून एवढा विलंब होऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामतः स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(४) **श्री.धनंजय मुंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“पंढरपूर येथे राज्य सरकारने ३०० कोटी रुपयांचा पंढरपूर कॉरिडॉर विकसित करण्यास सुरुवात केली असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ व मध्य प्रदेशात महाकाल कॉरिडॉर अंतर्गत ज्योतिर्लिंग स्थळी उच्च दर्जाच्या सुविधा व विकासकार्य करण्यात येत असून, महाराष्ट्रातील परळी सह विविध ज्योतिर्लिंग स्थळी रस्ते, दर्शन सभा मंडप, पार्किंग, पूरक व्यवसायांना दुकाने, यांसह विविध उच्च दर्जाच्या सोई-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असणे, केंद्र सरकारने तीर्थ स्थळांच्या विकास व संवर्धनासाठी सुरू केलेल्या प्रसाद योजनेत परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग समाविष्ट केले जावे, यासाठी राज्य सरकारने केंद्राला परिपूर्ण प्रस्ताव शिफारशीसह पाठविण्याची गरज, परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग व महाराष्ट्रातील अन्य सर्वच ज्योतिर्लिंग स्थळी प्रत्येकी ५०० कोटी रुपयांचा कॉरिडॉर तयार करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.”

अप्रकाशित

(५) **सर्वश्री. संग्राम थोपटे, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमित झनक, अमीन पटेल, कुणाल पाटील, संजय जगताप, ॲड.राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यटन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात मोठया प्रमाणावर गड किल्ले असून गड किल्ल्यांचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली असणे, विविध गड किल्ल्यांवर आवश्यक सोयी-सुविधा नसणे, किल्ल्यांची मोठया प्रमाणावर दुरावस्था झालेली असणे, राजगड, रायरेश्वर, रोहिडेश्वर, तोरणा, इत्यादी किल्यावर सुरक्षा रक्षकांकडून गैरवापर करीत असणे, अनेक किल्ल्याच्या पायथ्याशाी जाण्यासाठी रस्त्याची सुधारणा अपुरी असणे, अनेक किल्ल्यांवर सातत्याने मागणी करुन रोप-वे ची सुविधा उपलब्ध नसणे, पर्यटकांना सोयी-सुविधांची कमतरता भासणे, राज्यातील सर्व किल्ल्यांची पहाणी करुन त्रुटी दूर करण्याची आवश्यकता, किल्ल्यांच्या दुरावस्थेकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, राज्यातील गड किल्ल्यांची झालेली दुरावस्था दूर करण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री.जयकुमार रावल, रईस शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"धुळे शहरात तोडीपाणी डॉट कॉम या संकेतस्थळावरील +1 (575)308-5981 या क्रमांकाच्या मोबाईल वरून शहरातील मुलींचे छुप्या पध्दतीने फोटो काढून त्यांच्या पालकांना व इतरांना पाठवून बदनामी करण्याचा भयंकर प्रकार धुळे शहरात माहे फेब्रुवारी, २०२३ वा त्या सुमारास उघडकिस येणे, याबाबत धुळे शहर पोलिस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात येणे, यामुळे धुळे शहरात महिला व महाविदयालयीन मुलींमध्ये तसेच पालकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या गंभीर प्रकरणाची पोलिसांकडून अदयापपर्यंत कोणतीही दखल घेण्यात न येणे, उक्त प्रकरणी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची चौकशी करून तोडीपाणी डॉट कॉम या संकतेस्थळाची चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"माझगाव मुंबई येथील म्हातार पाखाडी रोड येथील सव्हे क्र.३१८, ३१९, ३२० व ३२२ येथील ४ जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव सन २०१० मध्ये तयार करण्यात येणे, मध्यतंरी दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ रोजी या ४

इमारतीस आग लागणे, सन २०२० मध्ये रहिवाश्यांनी जुन्या इमारतींच्या पुर्निविकासास मान्यता देणे, या योजनेमध्ये २३ मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर असताना विकासकाने न विचारता अतिरीक्त ७ मजले बांधणे, भाडेकरूंच्या संमतीविना विकासकाने बे व्हु बि.न.२ को.आ.है.सो.लि. नोंदणी करणे, भाडेकरूंना प्रत्येकी रू.२,२५,०००/- कॉर्पस फंड देण्याचे विकासकाने मान्य करुनदेखील अद्यापपर्यंत न देणे, विकसित केलेल्या बे व्हु बि. २ इमारती मधिल सर्व रहिवाश्यांच्या फ्लॅट मध्ये व सर्वच भागात पाण्याची गळती असणे, खालील मजल्यावर रहिवाशी रहात असताना वरील जादा अनधिकृत मजले बांधल्यामुळे रहिवाशांना धूळ, माती, सिमेंट इत्यादीचा त्रास होत असणे, याबाबत तक्रार करण्यास विकासक बाऊन्सरद्वारे धमकावणे व दहशत निर्माण करणे, एखादी घटना घडल्यास रहिवाश्यांना इमारतीबाहेर येण्याची सोय उपलब्ध नसणे, मा.गृहनिर्माण मंत्री, सचिव, आयुक्त  मुंबई महानगरपालिका व स्थनिक पालिका अधिकार यांच्याकडे तक्रार केलेली असणे, सदर संपुर्ण अनधिकृत बांधकाम व रहिवाशांना होत असलेला त्रास, रहिवाशांत निर्माण झालेले भितीचे व दहशतीचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाची भुमिका व प्रतिक्रिया."

(८) **श्री. रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (**MSEDCL**) मार्फत वीज वितरणात सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असणे, महाराष्ट्र शासनामार्फत भिवंडी शहरात दिनांक २६ जानेवारी, २००७ ला टोरंट पॉवर लिमिटेड या कंपनीला भिवंडी परिमंडळात महावितरणची वितरण फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, मागील पंधरा वर्षाच्या कालावधीत भिवंडी शहर हे महाराष्ट्रामध्ये वीजबील देयक भरण्याची कामगिरी  करणारे राज्यातील सर्वोत्कृष्ट एक शहर असणे, ज्यामुळे महावितरण आणि राज्य सरकारच्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय योगदान देण्यामध्ये भिवंडी शहर क्रमांक एकचे शहर असणे, उक्तविषयी तत्कालीन राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या सोबत दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी वीज ग्राहकांच्या जुन्या थकबाकीवर व्याज आकारणीबाबत या विषयावर बैठक आयोजित करण्यात आलेली असणे, भिवंडीतील अनेक ग्राहकांकडे महावितरणची जुनी थकबाकी आहे आणि जर व्याज माफी झाल्यास भिवंडीकर हफ्त्याहफ्त्यामध्ये रक्कम भरण्यास तयार असणे, भिवंडी शहरासारासारखेच शिळ-मुंब्रा-कळवा या ठिकाणी वीज वितरण करणेकामी प्रॉयव्हेट कंपनी फ्रँचायझी म्हणून कार्यरत असणे, सदर ठिकाणी जो करार झाला आहे त्याअनुषंगाने मूळ रकमेच्या ११०% रक्कम एकाच वेळी भरण्याचा आणि संपूर्ण  व्याज माफी मिळविण्याचा पर्याय पी डी ग्राहकांसाठी आधीच संपूर्ण व्याज माफी योजना अस्तित्वात असणे, परंतु भिवंडी मध्ये सदर योजना ५०% असल्याचा फरक काढण्याबाबत प्रामुख्याने मागणी करण्यात येणे, भिवंडीतील ग्राहकांना महावितरणाच्या

जुन्या थकबाकीसाठी समान पर्याय उपलब्ध करून देण्यात येणे, शिळ-मुंब्रा-कळवाच्या धर्तीवर योजना थेट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देणे, जुनी महावितरणाची थकबाकी स्वेच्छेने भरली जाणे, सदर विषयी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी महावितरणला या विषयाचा आढावा घेण्यास सांगणे, आणि त्यांना डेटा/तपशील प्रशासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, सद्यस्थितीत भिवंडी क्षेत्रात ३३००० महावितरणाचे ग्राहक असून महावितरणची जुनी थकबाकी सुमारे ५०० कोटी असणे, तसेच थकबाकींवरील व्याज वर्षानुवर्षे वाढत असल्याने महावितरणची थकबाकी सतत वाढणे. त्याअनुषंगाने "अमृत योजना" नावाची योजना सुरू केल्यास (**MSEDCL**) च्या रखडलेल्या महसुलात (कर आणि शुल्क) लक्षणीय वाढ होईल, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**चार : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ – महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(२)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३.

**(३)** सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**पाच : सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री हसन मुश्रीफ, अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, रईस शेख, विनोद निकोले, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे,**

अस्वाक्षरित प्रत

**ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील, विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री माधवराव पवार, धिरज देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील शेतकरी अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना 'टप्पा-२' मध्ये १ टक्काही रक्कम खर्च केली नसल्यामुळे मोठी रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, कृषि मंत्री यांनी वर्ग ३ च्या कर्मचाऱ्यांच्या आंतरविभागीय बदल्या, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, केंद्र सरकारकडून मनरेगा पंतप्रधान शेतकरी अनुदान योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून तुषार आणि ठिबकचे अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नसणे, "ग्रॉस डोमेस्टीक क्लायमेट रिस्क" या संस्थेच्या अहवालात महाराष्ट्राचाही समावेश असणे, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, कोरोनापश्चात ग्रामीण भागाकडे झालेले स्थलांतर लक्षात घेता स्थलांतरित मजुरांच्या हाताला काम देण्यासाठी जलसंधारण, रोपवाटिका, रोजगार हमीच्या कामांबरोबरच ग्रामविकासाच्या विविध योजना आखण्याची आवश्यकता, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याची

आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, या शेतकऱ्यांवर सरकारकडून लाठीचार्ज करण्यात आला असणे, पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नाडले जात असताना अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, परिणामी शेतकरी आत्महत्यांमध्ये मोठी वाढ झाली असणे, केंद्र सरकारची किसान ड्रोन अनुदान योजना कागदावरच राहिली असणे, कृषि मालाच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, पीक कर्ज देण्यासाठी बँकांनी हात आखडता घेतला असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थांच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जांमध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १२ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या काळात वादळाचा तडाखा बसून काजू बी आणि काजू झाडांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाची अंमलबजावणी होत नसणे, फळपीक कर्जासाठीच्या वाढीव व्याजामुळे संत्रा व इतर फळपिक उत्पादकांना तोटा सहन करावा लागत असणे, द्राक्षाची कमी झालेली निर्यात, मराठवाड्याप्रमाणे कोकणातही वानरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यासाठी धडक मोहिम राबवण्याची आवश्यकता, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदीअभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या घोषणेची अंमलबजावणी झाली नसणे, महाराष्ट्र राज्य दूध महासंघ (महानंद) आर्थिक अडचणीत आला असून याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, लॅम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील पशुधन संकटात आले असणे, राष्ट्रीय अंडी समन्वय समितीकडून अंड्याच्या दरात अवाजवी चढ-उतार होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत आला असणे, मच्छिमारांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मत्स्यव्यवसायला मत्स्यशेतीचा दर्जा देण्याबाबत होत असलेली मागणी, पर्सेसिन मच्छिमार बोटींमुळे निर्माण झालेले मच्छिमारांपुढील संकट, मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याची होत असलेली मागणी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामे सुरु करण्याबाबत सरकारची धरसोड वृत्ती, परभणी जिल्ह्यात कंत्राटदाराकडून लाच घेताना जलसंधारण विभागाचा उपविभागीय अधिकारी व लिपिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असणे, व्यवस्थापकीय संचालकांचाही यातील सहभाग उघड झाला असणे, या व अन्य समस्यांबाबत सरकार गंभीर नसल्यामुळे शेतकरी, शेतमजूर व शेतीवर अवलंबून असलेल्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

अग्रिम प्रत

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा :** **डॉ. संजय कुटे, सर्वश्री चिमणराव पाटील, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, संजय सावकारे, अनिल बाबर, डॉ.प्रा. अशोक उइके, श्री. राजेश पवार, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री तानाजी मुटकुळे, बबनराव लोणीकर, संजय गायकवाड, डॉ. देवराव होळी, सर्वश्री राजेंद्र पाटणी, समीर कुणावार, महेंद्र थोरवे, ॲड‌ आकाश फुंडकर, सर्वश्री सुरेश भोळे, जयकुमार रावल, भरतशेट गोगावले, हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, दिलीप बोरसे, योगेश कदम, संतोष दानवे, बबनराव पाचपुते, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री दिलीप लांडे, संभाजी निलंगेकर-पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री नितेश राणे, गणेश नाईक, अभिमन्यू पवार, ॲड‌ शहाजीबापू पाटील, सर्वश्री महेश शिंदे, प्रकाश आबिटकर, महेंद्र दळवी, विनोद अग्रवाल, राम सातपुते, जयकुमार गोरे, ज्ञानराज चौगुले, सुभाष देशमुख, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड‌ राहुल कुल, श्री. किसन कथोरे, डॉ. राहुल आहेर, डॉ. संदिप धुर्वे, सर्वश्री हरीष पिंपळे, दादाराव केचे, किर्तीकुमार भांगडीया, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाळे, कृष्णा गजबे, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री प्रकाश भारसाखळे, प्रताप अडसड, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री काशिराम पावरा, मंगेश चव्हाण, राजेश पाडवी, डॉ. तुषार राठोड, श्री. नारायण कुचे, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा चौधरी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, रविशेठ पाटील, महेश बालदी, महेश चौगुले, गणपत गायकवाड, योगेश सागर, राम कदम, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, राणा जगजितसिंह पाटील, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याण-शेट्टी, धनंजय गाडगीळ, समाधान अवताडे, प्रकाश आवाडे, रवि राणा, डॉ. विनय कोरे, सर्वश्री रत्नाकर गुट्टे, राजेंद्र राऊत, नामदेव ससाणे, भिमराव केराम, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा

मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना टाळाटाळ करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु.४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही आघाडी सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे, परंतू त्याच वेळेस महायुती सरकारने जून २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे, परंतू मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणारे १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, परंतू महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन, शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी मागील सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे, परंतु महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेव्दारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे, परंतु महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्हया-जिल्हयांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**सात : अशासकीय विधेयके :-**

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना)**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१- **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगार भत्ता विधेयक,२०२१ — **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०२ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ०८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक,२०२२ - **ॲड· राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ — **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे**.

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री. प्राजक्त तनपुरे, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र परदेशातील रोजगार संरक्षण विधेयक, २०२२ – **डॉ.राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे.**

**(ब) विचारार्थ :**

**(शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकाच्या सूचना)**

(१) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ – **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ – महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ – **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमीत साटम, वि.स.स. यांचे.**

अग्रिम प्रत

(६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित प्रत